# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २३/०७/२०२२ (शनिवार)**

**(दुपार)**

---

### जबरी चोरी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत २२ कि. मी. अंतरावरील मौजा आसोली शिवार येथे दि. २२/०७/२२ चे २१.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— नितीन दिगांबर वानखेडे, वय २४ वर्ष, रा. झुल्लर ता. कामठी हा आपल्या एमएच— ४०/बीआर— ३७४० क्रमांकाच्या मोटरसायकलने नागपुर वरून २०.३० वा. दरम्यान घरी(झुल्लर)येण्याकरीता निघाला असता अंदाजे ०९.३० वा. दरम्यान आसोली समोरील नाग नदी पुलीया पार केल्यानंतर पाठीमागुन एक २२० पल्सर मोटारसायकल फिर्यादीच्या समोर आडवी करून थांबवुन दोन अज्ञात आरोपीतांनी फिर्यादीला म्हटले की, 'तुने मेरे गाडी को कट क्यु मारा'? असे म्हणुन फिर्यादी सोबत हुज्जत बाजी करू लागले. फिर्यादीने गाडी घेवुन जाण्याचा प्रयत्न करीत असता आरोपीतांनी मोटरसायकलचा ब्रेक दाबुन फिर्यादीला खाली ऊतरविले व पॅटचे खिशे बॅग चेक करू लागले. फिर्यादीचा खिश्यामधुन नगदी ७,०००/—रू एमआय कंपनीचा मोबाईल काढुन घेतले. त्यानंतर फिर्यादीला ढकलुन फिर्यादीची एमएच— ४०/बीआर— ३७४० क्रमांकाची मोटरसायकल बळजबरीने संगनमत करून नागपुर चा दिशेने चोरून घेवुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३९२, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री सतीश सोनेकर मो.नं. ८९७५९२१७७० हे करीत आहे.

### शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो. स्टे. सावनेर** :— फिर्यादी नामे— सौ. अमृता आशिष ठाकरे वय ३१ वर्ष रा. प्लॉट नं ११, विद्या नगर, वाठोडा ले आउट त्रिभुवन सोसायटी नंदवन, नागपुर ह.मु. देवरावजी माधोराव मस वाघोडा सावनेर व आरोपी नामे— १) पति— आशिष गणेशजी ठाकरे हे दोघेही पतीपत्नी आहेत. अंतर्गत १२ कि.मी. अंतरावर मौजा पाटणसावंगी सावनेर येथे दिनांक १८/०६/२०१९ चे २०.२२ वा. ते १०.०० वा. पर्यंत आरोपी नामे— १) आशिष गणेशजी ठाकरे, २) सौ. सुहासीनी गणेशजी ठाकरे, रा. प्लॉट नं ११ विद्या नगर वाठोडा ले आउट त्रिभुवन सोसायटी नंदवन नागपुर ह.मु. देवरावजी माधोराव, वाघोडा, ३) सौ. रूपाली रूचीरजी महल्ले रा. प्लॉट ४०२ दमयंती प्लॉजा तिरंगा चौक नंदवन नागपुर व ४) श्रीमती निर्मलबाई मोहनजी ठाकरे रा. पाटणसावंगी सावनेर यांनी संगनमत करून फिर्यादीला वारंवार माहेरून पैश्याची मागणी केली. आरोपीतांनी मागणी पूर्ण न झाल्यानंतर फिर्यादीला शारीरिक व मानसिक त्रास देवुन तिचा छळ केला. तसेच आरोपीतांनी तिच्या चारित्र्यावर संशय घेवुन शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ४९८ (अ), ५०४, ५०६, ३४ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार संदिप नागरे मो.क्र. ९०११५९६५०० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**